# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : desk2a@dte.org.in Internet :http//:www.dtemaharashtra.gov.in


क्र.2अ/एडीएम/धनाकर्ष/2016/ ८८७

दिनांक : 11 JUL 2016

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे

विषय : शैक्षणिक वर्ष 2016-17 करिता सर्व व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान सुविधा केंद्र (Facilitation Centre) यांचेकडे जमा असलेल्या रोख रकमेबाबत

शैक्षणिक वर्ष 2016-17 करिता सर्व व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेकरिता सुविधा केंद्र(Facilitation Centre) निश्चित करण्यात आलेले आहेत. प्रवेश प्रक्रियेदरम्यान सुविधा केंद्राकडे अर्ज विक्रि व Category Coversion करिता आकारण्यात आलेल्या शुल्काची रोख रक्कम जमा करण्यात आलेली आहे. सदर रोख रक्कम जमा करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

01. विभागीय कार्यालयांनी त्यांच्या विभागांतर्गत येणा-या सर्व सुविधा केंद्राकडून अभ्यासक्रमनिहाय जमा रोख रकमेचा Commissioner, State CET Cell, Maharashtra State" यांचे नावे "Payable at Mumbai" असलेला धनाकर्ष प्राप्त करुन घ्यावा.

02. अ) अभ्यासक्रमनिहाय सर्व केंद्राचे एकत्रित धनाकर्ष विक्रिच्या तपशीलासह राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण, 305, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, 49, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई 400 051 यांना सादर करावेत.

ब) धनाकर्षाची Bankwise यादी करुन यादीच्या Soft Copy सह धनाकर्ष सादर करावेत.

03. धनाकर्षाची मुदत तीन महिने असल्यामुळे धनाकर्ष मुदतबाह्य होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

04. Category Conversion संदर्भात केंद्राकडे जमा असलेली रक्कम केंद्राला देय मानधनामधून समायोजित करण्यात येणार असल्यामुळे त्याबाबतचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासंदर्भात सर्व संबंधित सहसंचालक यांनी त्यांच्या विभागांतर्गत येणा-या सुविधा केंद्राना कळविण्यात यावे. वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन अर्ज विक्रिसंदर्भातील धनाकर्ष राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे जमा करण्यात यावेत.

(दयानंद मेश्राम)

सह संचालक

तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१६/3608

दिनांक 11 JUL 2016

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेकरिता शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता संचालनालयाकडून सुविधा केंद्र (Facilitation Centre) निश्चित करण्यात आलेल्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, प्रवेश प्रक्रियेदरम्यान सुविधा केंद्राकडे अर्ज विक्रि व Category coversion करिता आकारण्यात आलेल्या शुल्काची रोख रक्कम जमा करण्यात आलेली आहे. सदर रक्कम जमा करण्यासंदर्भात वरील पत्रात नमुद केल्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

11/07

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.